# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या (तातडीच्या) २०८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## सोमवार, दि.०८ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा.

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २०७ वी (तातडीची) बैठक **सोमवार, दि.०१ डिसेंबर, २०२५ रोजी दुपारी ०२:०० वा.** Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे मा.कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. परंतु, बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सदरची बैठक **सोमवार, दि.०८/१२/२०२५ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. आय. जे. तांबोळी | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | अनुपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. अजयकुमार जाधव, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्र.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अभिनंदन:**

प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा यांना प्र-कुलगुरु पदावर दोन वर्ष पूर्ण झाल्याने त्यांचे व ऑक्टो./नोव्हेंबर, २०२५ मधील परीक्षांचे निकाल वेळेत पूर्ण केल्याबद्दल डॉ. श्रीकांत अंधारे, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे ही मा. कुलगुरु महोदय यांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत व अभिनंदन करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर व डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड यांनी आपली अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | दि.२७ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०७ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.२७ नोव्हेंबर, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०७ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र.१ मधील ठरावामध्ये सुचविलेला दुरुस्तीमध्ये (दि.१४ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.७) खालीलप्रमाणे पुनश्च: दुरुस्ती करण्यात आली. | अभियांत्रिकी विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठ परिसरामध्ये एकूण रु. २०० कोटींची खालील कामे करण्याकरिता प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | तंत्रज्ञान संकुल इमारत आणि उपकरणे | १५ कोटी |
| ०२ | विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुलांचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | २५ कोटी |
| ०३ | विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुलींचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | २५ कोटी |
| ०४ | विद्यापीठ परिसरामध्ये ५० क्षमतेचे दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनीकरिता वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | ५ कोटी |
| ०५ | विद्यापीठ परिसरामध्ये ५० क्षमतेचे तृतीयपंथी वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | ५ कोटी |
| ०६ | अत्याधुनिक केंद्रीय आणि वैज्ञानिक उपकरणे केंद्र आणि प्रयोगशाळा | १५ कोटी |
| ०७ | कौशल्य विकास केंद्र इमारत आणि उपकरणे | १५ कोटी |
| ०८ | रंगभवन अभ्यासकेंद्र येथे विद्यार्थी विकास केंद्र अभ्यासिका इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | १५ कोटी |
| ०९ | Artificial Intelligence and High-Performance Computing (AIHPC) इमारत बांधणे व उपकरणे खरेदी करणे. | १५ कोटी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १० | विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थान इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | २० कोटी | |
| | ११ | वाहनतळ | ५ कोटी | |
| | १२ | क्रीडा विभागाकरिता टेक्नो जीम करणे, ॲस्ट्रोर्टफ हॉकी ग्राऊंड तयार करणे. | १५ कोटी | |
| | १३ | School of Sports Sciences करिता स्वतंत्र इमारत ज्यामध्ये B.P.Ed. / M.P.Ed. / Diploma कोर्सेस / Degree Programme चालू करण्याकरिता इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | १५ कोटी | |
| | १४ | मा. कुलगुरु महोदय व मा. प्र. कुलगुरु महोदय यांच्या निवासस्थान इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | १० कोटी | |
| | | एकूण | २०० कोटी | |
| | | दुरुस्त केलेला ठराव | | |
| | ०१ | तंत्रज्ञान संकुल इमारत आणि उपकरणे | १५ कोटी | |
| | ०२ | विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुलांचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | २५ कोटी | |
| | ०३ | विद्यापीठ परिसरामध्ये ५०० क्षमतेचे मुलींचे वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | २५ कोटी | |
| | ०४ | विद्यापीठ परिसरामध्ये ५० क्षमतेचे दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनीकरिता वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | ५ कोटी | |
| | ०५ | विद्यापीठ परिसरामध्ये ५० क्षमतेचे तृतीयपंथी वसतिगृह इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | ५ कोटी | |
| | ०६ | अत्याधुनिक केंद्रीय आणि वैज्ञानिक उपकरणे केंद्र आणि प्रयोगशाळा | १५ कोटी | |
| | ०७ | कौशल्य विकास केंद्र इमारत आणि उपकरणे | १५ कोटी | |
| | ०८ | रंगभवन अभ्यासकेंद्र येथे विद्यार्थी विकास केंद्र अभ्यासिका इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | १५ कोटी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ०९ | Artificial Intelligence and High-Performance Computing (AIHPC) इमारत बांधणे व उपकरणे खरेदी करणे. | २० कोटी | |
| | १० | विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थान इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | २० कोटी | |
| | ११ | वाहनतळ | ५ कोटी | |
| | १२ | क्रीडा विभागाकरिता टेक्नो जीम करणे, ॲस्ट्रोर्टफ हॉकी ग्राऊंड तयार करणे. | १५ कोटी | |
| | १३ | School of Sports Sciences करिता स्वतंत्र इमारत ज्यामध्ये B.P.Ed. / M.P.Ed. / Diploma कोर्सेस / Degree Programme चालू करण्याकरिता इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | १५ कोटी | |
| | १४ | मा. कुलगुरु महोदय व मा. प्र. कुलगुरु महोदय यांच्या निवासस्थान इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | १० कोटी | |
| | १५ | सर्व अध्यासन केंद्र इमारतीचे बांधकाम व फर्निचर. | १५ कोटी | |
| | १६ | मोठी पाण्याची टाकी बांधणे | ०५ कोटी | |
| | एकूण | | २२५ कोटी | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | **दि.०१/१२/२०२५ रोजीच्या ऑनलाईन इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.०१/१२/२०२५ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सबब, विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार दि.०१/१२/२०२५ रोजीच्या ऑनलाईन इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **दि.०१/१२/२०२५ रोजीच्या ऑनलाईन इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | **दि.०५/१२/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.०५/१२/२०२५ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सबब, विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार दि.०५/१२/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **दि.०५/१२/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४ ] | **शास्त्रीय उपकरण केंद्राकडील Field Emission Scanning Elecron Microscope (FESEM) with EDS या उपकरणांमधून रसायनांच्या नमुन्यांचे परिक्षण करण्याकरिता फेरनिश्चित केलेल्या दरांची बाब विचारार्थ.** | शास्त्रीय उपकरण केंद्र |

टिपणी: शास्त्रीय उपकरण केंद्राकडे Field Emission Scanning Electron Microscope (FESEM) with EDS हे उपकरण नव्याने खरेदी करुन Installation करण्यात आले आहे. सदर उपकरणाद्वारे करण्यात येणाऱ्या रासायनिक नमुन्यांचे परिक्षण करण्यासाठी दर फेरनिश्चित करण्याकरीता दि.११/०७/२०२४ रोजी मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिली आहे. त्या संदर्भाने तांत्रिक समितीने दि.११/११/२०२५ रोजी नव्याने प्रस्तावित फेरनिश्चित दरांचा अहवाल दिला आहे. तसेच ही दर आकारणी करताना १) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये २) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाबाहेरील महाविद्यालये व इतर संस्था ३) इंडस्ट्रीज अशा तीन गटांमध्ये विभागणी करुन दि.११/११/२०२४ रोजी प्रस्तावित दर निश्चितीचा अहवाल दिला आहे. उपरोक्त तांत्रिक समितीने निश्चित केलेल्या दरास दि.२७/११/२०२५ रोजी मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे. फेरनिश्चित दर खालीलप्रमाणे आहेत.

| | PAH Solapur University and Affiliated Instututes (INR) | Other Institutes (INR) | Industry (INR) |
|---|---|---|---|
| Present Charges | 1500+500=2000 (FESEM)+(EDS) | 2000+500=2500 (FESEM)+(EDS) | 5000+1000=6000 (FESEM)+(EDS) |
| Revised Charges | 800+200=1000 (FESEM)+(EDS) | 1200+300=1500 (FESEM)+(EDS) | 5000+1000=6000 (FESEM)+(EDS) |

सबब, शास्त्रीय उपकरण केंद्राकडील Field Emission Scanning Elecron Microscope (FESEM) with EDS या उपकरणांमधून रसायनांच्या नमुन्यांचे परिक्षण करण्याकरिता फेरनिश्चित केलेल्या दरांची बाब विचारार्थ.

ठराव: **शास्त्रीय उपकरण केंद्राकडील Field Emission Scanning Elecron Microscope (FESEM) with EDS या उपकरणांमधून रसायनांच्या नमुन्यांचे परिक्षण करण्याकरिता खालीलप्रमाणे फेरनिश्चित केलेल्या दरांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| | **PAH Solapur University and Affiliated Instututes (INR)** | **Other Institutes (INR)** | **Industry (INR)** |
|---|---|---|---|
| **Present Charges** | **1500+500=2000 (FESEM)+(EDS)** | **2000+500=2500 (FESEM)+(EDS)** | **5000+1000=6000 (FESEM)+(EDS)** |
| **Revised Charges** | **800+200=1000 (FESEM)+(EDS)** | **1200+300=1500 (FESEM)+(EDS)** | **5000+1000=6000 (FESEM)+(EDS)** |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ५ ] | **सन २०२५-२६ “उत्कर्ष” सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रमाचे नियोजनाकरिता विद्यापीठ फंडातून तरतूद करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: सन २०२५-२६ “उत्कर्ष” सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रमाचे यजमानपद प्रस्तुत विद्यापीठाकडे देण्यात आले आहे. तरी सदरचा महोत्सव कार्यक्रम माहे जानेवारी किंवा फेब्रुवारी, २०२६ मध्ये आयोजन करण्यात यावे असे कळविलेले आहे. त्याकरिता सन २०२५-२६ “उत्कर्ष” सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रम प्रस्तुत विद्यापीठामध्ये आयोजन करण्याकरिता एकुण रु. ३,६६,०००/- इतके अनुदान प्राप्त होणार आहे. सदर अनुदान मार्च, २०२६ पूर्वी प्राप्त होणार असल्याने सदर कार्यक्रमाकरिता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे खर्च होणार आहे. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |

| अ.क्र. | तपशिल | नग | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १. | “उत्कर्ष” कार्यक्रमासाठी मंडप व दोन रंगमंचावरती साऊड सिस्टीमची (तीन दिवसाकरिता टीपॉय, मॅटींग, ५५० खुर्चीसह) | – | ४,२०,००० |
| २. | अंदाजे ३०४ विद्यार्थी व संघव्यवस्थापक तसेच सदरचा कार्यक्रम व्यस्थितरित्या पार पाडण्यासाठी विद्यापीठाने तयार करण्यात आलेल्या विविध कमिटी सदस्य, परीक्षक, प्रमुख पाहुणे असे एकूण अंदाजे ४०० जणांना दोन वेळचा चहा, एक वेळ नाष्टा व दोन वेळ जेवण तसेच पाणी झार (३ दिवस) | ४०० | ४,५०,००० |
| ३. | व्हिडिओ शुटींग व छायाचित्रणची (सी.डी. तयार करणे व अल्बमसह) व्यवस्था | – | ४०,००० |
| ४ | ४०० नग प्रमाणपत्र | ४०० | १०,००० |
| ५. | ४०० नग ओळखपत्र व लेस | ४०० | ७००० |
| ६. | ३ दिवसाचे ४०० नग कुपन व इतर साहित्य | ४०० | १५,००० |
| ७. | ५० नग निमंत्रण पत्रिका | ५० | २००० |
| ८. | अंदाजे ०५ ते ७ नग डिजीटल बॅनर | ०७ | १०,००० |
| ९. | (प्रथम, व्दितीय व तृतीय स्मृतिचिन्हे व विभागूण स्मृतिचिन्हे), परीक्षक संघव्यवस्थापक, प्रमुख पाहुणे असे एकूण अंदाजे १५० नग | १५० | १,००,००० |
| १०. | परीक्षक यांना शासनाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार मानधन व विद्यापीठ नियमानुसार TA/DA अदा कार/बस/रेल्वे इ. | ५० | ८०,००० |
| ११. | शाल, हार, पाणी बाटली व इतर खर्च | – | २०,००० |
| | एकूण | | १२,००,०००/- |

१. "उत्कर्ष" सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रम आयोजनाकरिता वरील सर्व बाबीकरिता अंदाजे रक्कम रु.१२,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामध्ये शासनाकडून प्राप्त होणारी अनुदान रक्कम रु.३,६६,०००/- इतकी असून सदरची रक्कम मार्च, २०२६ पूर्वी विद्यापीठास प्राप्त होणार आहे. त्याकरिता सदरची रक्कम जमा करुन घेण्यासाठी अंदाजपत्रक शिर्षक उपलब्ध नसल्याने Development Budget Part-I अंतर्गत State Level Utkarsh Ex. जमा व खर्च बाजू उघडणे आवश्यक आहे.

२. राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत State Level Utkarsh Expenses हे नवीन अंदाजपत्रक उघडून Punyashlok Ahilyadevi Holkar Trishatabdi Janmostav Expenses या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकामधून अंदाजे रु.१२,००,०००/ इतकी रक्कम वर्ग करुन तात्पुरत्या स्वरुपात पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

सबब, वरील १ व २ च्या अनुषंगाने शासनाकडून प्राप्त होणारी रक्कम रु.३,६६,०००/- विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर जमा करुन घेण्यास व खालील अंदाजपत्रकीय शिर्षकामधून State Level Utkarsh Expenses मध्ये १२,००,०००/- इतकी रक्कम पुनर्विनियोजन करण्याची बाब विचारार्थ.

| Expenditure Side | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr No | Budget Head | Original Provision Rs. | Expenses up to date | Available Balance As on 29/11/2025 | Re-Appropriation | Revised Provision Rs. |
| 1. | P.A.H. Trishatabdi Janmostav Expen. | 75,00,000/- | 4,15,420/- | 70,84,580/- | (-) 12,00,000/- | 58,84,580/- |
| 2. | State Level Utkarsh Expenses | Nil | Nil | Nil | (+)12,00,000/- | 12,00,000/- |

ठराव: सन २०२५-२६ "उत्कर्ष" सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रमाचे नियोजनाकरिता विद्यापीठ फंडातून तरतूद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच कार्यक्रमाचे नियोजनाकरिता शासनाकडून प्राप्त होणारी रक्कम रु.३,६६,०००/- विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर जमा करुन घेण्यास व **P.A.H. Trishatabdi Janmostav Expenses** या अंदाजपत्रकीय शिर्षकामधून State Level Utkarsh Expenses मध्ये १२,००,०००/- इतकी रक्कम पुनर्विनियोजन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ६ ] | **सन २०१०-११ आर्थिक वर्षाचे आयकर असेसमेंट संदर्भातील Miscellaneous Application No. २५२/PUN/२०२३ अपिल मागे घेण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: सोबत जोडलेल्या आदेश व मान्यतेच्या टिपणीचे अवलोकन व्हावे. त्यामधील दि.२८/०३/२०१४ रोजीच्या मा. आयकर आयुक्त, पुणे यांचे आदेशान्वये रु.२,४९,९४,४२०/- इतकी आयकर/शास्ती Demand Notice करण्यात आली होती. सदर आदेशाविरुध्द अपील चालविणेकरीता पुणे येथील सनदी लेखापाल श्री. सुनिल गानु यांची दि.२७/०७/२०१८ रोजीच्या मा. कुलगुरु यांचे मान्यतेने नियुक्ती करण्यात आली. वेळोवेळी अपीलाचे तारखेस श्री. सुनिल गानु उपस्थित राहून विद्यापीठाची बाजू मांडली आहे. तथापि, सदर अपीलावर दि. २२/०६/२०२२ रोजी निर्णय होवून अपील Dismiss करण्यात आले आहे. सदर आदेशाच्या विरोधात Appellate Tribunal, Income Tax, Pune यांचेकडे श्री. सुनिल गानु यांचेमार्फत Miscellaneous Application दाखल करण्यात आले. सदर बाबत सुनावणी होवून दि. १८/०८/२०२३ रोजी झालेल्या आदेशाप्रमाणे सदर केस पुनश्चः Dismiss करण्यात आली आहे. याबाबत, वित्त व लेखा अधिकारी व श्री. सुनिल गानु यांची चर्चा झाल्याप्रमाणे, पुढील दोन आठवडयात कार्यवाही करावी, असे श्री. सुनिल गानु यांनी कळविले होते. सदर वस्तुस्थिती दि.१५/०९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीत विषय क्र. २३ अन्वये ठेवण्यात आली. त्यावर श्री. सुनिल गानु यांचेमार्फत पुनश्चः अपील करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्यानुसार सनदी लेखापाल, पुणे श्री. सुनिल गानु यांचेमार्फत पुनश्चः अपील दाखल करण्यात आले. श्री. सुनिल गानु हे आजारी असुन स्मृतीभंग झाल्याने सदर केस चालविण्यामध्ये खुपच अडचणी निर्माण होत असल्याने सदर केस श्री. प्रमोद शिंगटे, सनदी लेखापाल तथा आयकर सल्लागार यांना केस चालविण्याकरीता देण्यास दि. १०/०३/२०२५ अन्वये मा. कुलगुरु महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री. प्रमोद शिंगटे यांनी उक्त केसबाबत दि.०४/१२/२०२५ रोजीच्या E-Mail द्वारे सविस्तर मार्गदर्शन केले असून त्यानुसार दि.१३/०६/२०१६ रोजीच्या आदेशाप्रमाणे उत्पन्न निरंक असल्यामुळे सदर केस/अपील मागे घेण्याबाबत शिफारस केली आहे.<br>सदर अपील मागे घेण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने वेळोवेळी अधिकार पत्र व विविध कागदपत्रे द्यावी लागणार आहेत. त्याकरीता वित्त व लेखा अधिकारी यांना अधिकारपत्रावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यास व वेळोवेळी मागणी केलेले कागदपत्रे देण्यास मान्यता असावी.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाचे आयकर सल्लागार श्री. प्रमोद शिंगटे, सनदी लेखापाल, पुणे यांनी सन २०१०-११ चे अपील मागे घेणेबाबतची वरीलप्रमाणे केलेली शिफारस त्याकरीता मागणी केलेले कागदपत्रे देण्यास तसेच त्याकरीता वित्त व लेखा अधिकारी यांना स्वाक्षरी करण्याचे अधिकारपत्र देण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **सन २०१०-११ आर्थिक वर्षाचे आयकर असेसमेंट संदर्भातील Miscellaneous Application No. २५२/PUN/२०२३ अपिल मागे घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच याकरिता आयकर सल्लागार श्री. प्रमोद शिंगटे, सनदी लेखापाल, पुणे यांनी मागणी केलेले कागदपत्रे देण्यास व त्याकरीता वित्त व लेखा अधिकारी यांना स्वाक्षरी करण्याचे अधिकारपत्र देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ७ ]</td><td>अभ्यासकेंद्र येथील प्रवेश शुल्कामध्ये वाढ करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तूत विद्यापीठ अंतर्गत अभ्यासकेंद्र रंगभवन येथे शहरातील विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी विविध स्पर्धा परीक्षांचे अभ्यास करण्यासाठी अनेक वर्षापासून सुरु आहे. त्याअनुषंगाने सोलापूर शहरातील विद्यार्थी व विद्यार्थीनीकरीता स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी अभ्यासकेंद्राचा लाभ घेण्यासाठी चांगला प्रतिसाद आहे. विद्यार्थ्यांसाठी अभ्यासकेंद्राची वेळ सकाळी ०७ ते सायंकाळी ११ व विद्यार्थीनींसाठी सकाळी ०७ ते सायंकाळी ०६ पर्यंत अशी आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासकेंद्रातर्फे स्पर्धा परीक्षांची लागणारी स्पर्धा पुस्तके, चालू घडामोडी, दैनंदिन वर्तमानपत्रे (मराठी व इंग्रजी भाषा) तसेच नोकरीच्या जाहिरातीच्या माहितीसाठी लागणारे रोजगार, नोकरी संदर्भ या सुविधा दिल्या जातात. विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र असे दोन अभ्यासिका आहेत. तसेच माजी खासदार शिवाचार्य जयसिध्देश्वर महाराज यांच्या खासदार निधीतून सुमारे २३ लाख रुपयांचे स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी २० संगणक, १ ए. सी., १ टी. व्ही. व १ प्रिंटर इ. साहित्य देण्यात आलेले आहेत. सन २०२५ पासून सदरील संगणक कक्ष हे सूसज्य अशा इंटरनेट सुविधेसह विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात आले असून, संगणक कक्षाचा वापर विद्यार्थी अभ्यासासाठी नियमित करीत आहेत. जानेवारी, २०२५ ते डिसेंबर, २०२५ पर्यंत २५३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे.<br>तथापि, दि.१६ जुलै, २०१९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.१६ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.
<table><tr><td>ठराव क्र.१६</td><td>अभ्यासकेंद्र येथे प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना रु.६००/- इतके प्रवेश शुल्क आकारण्यात यावे. तसेच उपरोक्त अ.क्र.३ नुसार अभ्यासकेंद्राचे वार्षिक शुल्क प्रत्येक वर्षी १०% वाढविण्याची केलेली शिफारस रद्द करण्यात यावे असेही ठरले.</td></tr></table>
सबब, उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने, जानेवारी, २०२० पासून अभ्यासकेंद्राच्या वार्षिक शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नसून, सदरचे वार्षिक शुल्क जानेवारी, २०२६ पासून रु.६००/- प्रमाणे घ्यावे किंवा सदरच्या वार्षिक शुल्कामध्ये वाढ करावी याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.</td><td>अभ्यासकेंद्र</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>अभ्यासकेंद्र येथे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून रु.७१०/- (प्रवेश शुल्क व फॉर्म शुल्क) आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ.क्र</th><th colspan="2">विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ८ ]</td><td colspan="2">दि.०५/१२/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतास दि.०५/१२/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला कार्यवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: दि.०५/१२/२०२५ रोजी झालेल्या खरेदी समितीचा बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No. S.३२४ नुसार वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेची मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार खरेदी समितीचा कार्यवृत्तांत दि.०५/१२/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीसमोर ठेवण्यात आला होता. त्यास वित्त व लेखा समितीने संपूर्ण कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.<br>सबब, दि.०५/१२/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास दि.०५/१२/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला कार्यवृत्तांत विचारार्थ.</td><td>कुलसचिव कार्यालय (खरेदी व भांडार विभाग)</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td colspan="2">दि.०५/१२/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतातील विषय क्र. २ वर झालेल्या ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करुन, दि.०५/१२/२०२५ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>ठराव क्र. २</td><td>Scanning ICR, OCR, Digitization of Student◦s Mark Sheet, Office Record and Web Portal Development याकरिता न्युनतम दर असलेल्या M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd., Mumbai या फर्मला वाटाघाटी (Negotiation) करुन दर अंतिम करण्यासाठी समिती गठीत करुन सदर समितीकडून दर अंतिम करण्याची शिफारस वित्त व लेखा समितीस करण्यात आली.<br>१. प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत – अध्यक्ष<br>२. श्री. सुधाकर तुकाराम सरवदे – सदस्य<br>३. श्री. सचिन मारुती गायकवाड – सदस्य<br>४. डॉ. अतुल तानाजी लकडे, प्र.कलसचिव – सदस्य<br>५. डॉ. आर. एस. मेंते – सदस्य<br>६. श्री. प्रशांत चोरमले, यंत्रणा विश्लेषक – सदस्य</td><td></td></tr>
</table>

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(१)] | **पीएम-उषा योजनेच्या इक्युपमेंट घटकांतर्गत ६९ उपकरणे (६२ उपकरणे GeM/ई-निविदा आणि ७ उपकरणे एकलस्त्रोत (Single Source)) पुरवठादाराकडून खरेदी करण्याबाबत व सदर उपकरणे GeM पोर्टलवर उपलब्ध नसल्यास शासनाच्या CVC मार्गदर्शक सूचनानुसार व वित्त व लेखा विभागाच्या नियमानुसार प्रक्रिया राबविणेची बाब विचारार्थ.** | पीएम-उषा विभाग |

टिपणी: पीएम-उषा योजने अंतर्गत Multi-disciplinary Education and Research Universities (MERU) Part-१ अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठास १०० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार Equipments घटका अंतर्गत उपकरणे खरेदीसाठी रु. ३६,२५,२०,९२९/- इतकी तरतूद करण्यात आली आहे.

यापूर्वी सदर योजने अंतर्गत DPR सादर करतेवेळी इक्युपमेंट घटका अंतर्गत ८८ उपकरणे खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास निविदा काढण्याची बाब दि. ०७ जून, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीत विषय क्र. ४ अन्वये सादर केला असता खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

| ठराव | प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठाने सादर केलेला Component-१ (Multi-disciplinary Education and Research Universites) प्रस्ताव नुसार Equipments अंतर्गत खालील उपकरणे खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी निविदा काढण्यास व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास खालीलबाब वगळून सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
|---|---|---|
| | MATLAB (Campus wide suite includes full suite, MATLAB online academi training suite and MATLAB grader) | 20,98,429 |

वर नमूद ठरावाप्रमाणे ०९ उपकरणांची खरेदी करण्यात आली आहे. ६९ उपकरणे (६२ उपकरणे GeM/ई-निविदा आणि ७ उपकरणे एकलस्त्रोत (Single Source)) पुरवठादाराकडून खरेदी करावी लागणार आहे. सदर उपकरणे GeM पोर्टलवर उपलब्ध नसल्यास शासनाच्या CVC मार्गदर्शक सूचनानुसार व वित्त व लेखा विभागाच्या नियमानुसार प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.

गठीत केलेल्या तांत्रिक समितीने खालील नमूद उपकरण खरेदीसाठी Technical Specification सादर केले असून त्यानुसार GeM पोर्टलवर Custom Bid पध्दतीने/ई-निविदा पध्दतीने प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | **Custom / Other Bid** क्रमांक | DPR पान क्रमांक व अनुक्रमांक | उपकरणाचे नाव | नग | मंजूर उपकरणांची एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Custom Bid- 01 | 109 (02) | High resolution Transmission Electron Microscope (HRTEM) | 1 | 7,00,00,000/- |
| 2 | | 109 (03) | X-ray Photoelectron Spectroscope (XPS) | 1 | 4,25,27,148/- |
| 3 | Custom Bid- 02 | 112 (19) | Ultraviolet-Visible Spectrophotometer (UV visible Spectrometer) | 1 | 10,00,000/- |
| 4 | | 113 (21) | Fluorimeter | 1 | 15,00,000/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | 116 (41) | Nano Drop | 1 | 2,50,000/- | |
| | 6 | | 114 (28) | Rotary evaporator (Make Buchi) | 5 | 40,00,000/- | |
| | 7 | | 119 (64) | X-Ray Fluorescence (XRF) Analyzers: Handheld | 1 | 25,00,000/- | |
| | 8 | | 119 (67) | Laser Ablation Inductively Coupled Plasma Mass Spectrometry (LAICP-MS) | 1 | 98,50,000/- | |
| | 9 | | 112 (17) | High Resolution Mass Spectrometer (HRMS) | 1 | 3,90,00,000/- | |
| | 10 | Custom Bid- 03 | 109 (04) | RAMAN Spectrometer | 1 | 1,50,00,000/- | |
| | 11 | | 112 (18) | Fourier Transform Infra-Red spectrometer (FT-IR) | 1 | 30,00,000/- | |
| | 12 | | 118 (54) | Real Time Reverse Transcriptase-Polymerase Chain Reaction (RT-PCR) | 1 | 15,00,000/- | |
| | 13 | | 113 (20) | Gel Permeation Chromatography (GPC) | 1 | 40,00,000/- | |
| | 14 | | 116 (45) | Fermenter (Bioreactor) 10 L | 2 | 10,00,000/- | |
| | 15 | Custom Bid- 04 | 114 (29) | Advance Stability Chamber | 1 | 3,00,000/- | |
| | 16 | | 116 (44) | Colony counter automatic | 1 | 1,50,000/- | |
| | 17 | | 117 (47) | BOD meter automatic | 1 | 2,00,000/- | |
| | 18 | | 118 (60) | Deep freezer 300L Temperature range 0°C to 20°C | 3 | 6,00,000/- | |
| | 19 | | 117 (46) | Deep freezer 300L Temperature range 0°C to -80°C | 1 | 2,00,000/- | |
| | 20 | | 116 (39) | Digital Microscope | 6 | 6,00,000/- | |
| | 21 | | 121 (76) | Fume wood chamber | 2 | 10,00,000/- | |
| | 22 | | 116 (43) | Laminar air flow | 4 | 4,00,000/- | |
| | 23 | | 116 (38) | Microscopes | 50 | 5,00,000/- | |
| | 24 | | 113 (23) | Potentiostat (double Channel) | 1 | 30,00,000/- | |
| | 25 | | 115 (37) | Probe Sonicator | 1 | 2,00,000/- | |
| | 26 | | 115 (36) | Rotary evaporator | 1 | 1,00,000/- | |
| | 27 | | 115 (32) | Spectro photometer | 1 | 4,50,000/- | |
| | 28 | | 115 (35) | Water bath | 1 | 20,000/- | |
| | 29 | Custom Bid- 05 | 113 (24) | High Pressure Reactor | 1 | 2,00,000/- | |
| | 30 | | 114 (26) | Continuously stirred tank reactor | 1 | 3,00,000/- | |
| | 31 | | 114 (30) | Oil Extractor | 1 | 15,00,000/- | |
| | 32 | | 117 (52) | S.S. Water distillation unit | 4 | 40,000/- | |
| | 33 | | 121 (77) | Multi gas detector device Type I and II | 1 | 10,00,000/- | |
| | 34 | Custom Bid- 06 | 111 (09) | Electrochemical workstation with battery cycler | 1 | 25,00,000/- | |
| | 35 | | 113 (22) | Solar Simulator | 1 | 9,00,000/- | |
| | 36 | | 114 (27) | Fluidised bed reactor | 1 | 5,00,000/- | |
| | 37 | | 115 (34) | Rossmils | 1 | 2,50,000/- | |
| | 38 | | 118 (55) | Protein Purification unit | 1 | 15,00,000/- | |
| | 39 | | 119 (62) | Field Spectrometers | 1 | 4,00,000/- | |
| | 40 | | 119 (63) | Seismic Profilers | 1 | 7,00,000/- | |
| | 41 | | 120 (70) | Remote Sensing Equipment (Drones and Satellite Imagery) | 1 | 10,00,000/- | |
| | 42 | | 120 (75) | Automatic Mapping Water Detector | 1 | 3,00,000/- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 43 | Custom Bid- 07 | 110 (06) | Wyan Kerr Programmable Impedance Analyzer | 1 | 20,00,000/- | |
| | 44 | | 110 (07) | Programmable Keithley 6514E Electrometer | 1 | 10,00,000/- | |
| | 45 | | 110 (08) | Contact Angle Measurement Unit | 1 | 5,00,000/- | |
| | 46 | | 114 (25) | Electro spinning Unit | 1 | 10,00,000/- | |
| | 47 | | 116 (40) | Air sampler | 1 | 1,50,000/- | |
| | 48 | | 116 (42) | Gel Documentation System | 1 | 2,00,000/- | |
| | 49 | | 117 (48) | Dissolved oxygen sensor | 3 | 60,000/- | |
| | 50 | | 119 (61) | Differential Global Positioning System (DGPS) | 1 | 15,00,000/- | |
| | 51 | | 119 (66) | Geochemical Analyzers | 1 | 3,00,000/- | |
| | 52 | | 120 (72) | Gravity Meters | 1 | 1,00,000/- | |
| | 53 | Custorn Bid- 08 | 117 (53) | Computer workstation | 2 | 4,00,000/- | |
| | 54 | | 118 (56) | Cold room | 1 | 15,00,000/- | |
| | 55 | | 119 (65) | Petrographic Microscopes with camera | 2 | 20,00,000/- | |
| | 56 | | 120 (69) | Magnetometers | 1 | 17,500/- | |
| | 57 | | 120 (71) | Cutting Polishing and thin section unit | 1 | 10,00,000/- | |
| | 58 | Other Bid- 09 | 122 (83) | Rack for Vouchers | 4 | 1,00,00,000/- | |
| | 59 | | 122 (84) | Server for Tally | 1 | 25,00,000/- | |
| | 60 | | 122 (85) | Scanner and Printer for digitalization of Records | 2 | 25,00,000/- | |
| | 61 | | 109 (1) | Solar Generation for Administration building | 500 KV | 5,00,00,000 | |
| | | | 109 (1) | Solar Generation for Multipurpose Hall | 150 KV | | |
| | 62 | | 122 (82) | Computer for Schools & Administration section (I-7 Series) | 300 | 2,25,00,000 | |
| | 63 | Signle Source | 111 (10) | Brunauer Emmett Teller (BET) Surface Analyzer | 1 | 2,00,000 | |
| | 64 | | 111 (11) | Thickness Profilometer | 1 | 1,50,000 | |
| | 65 | | 111 (13) | Programmable Logic Controller (PLC) & Supervisory Control and Data Acquisition (SCADA) | 1 | 3,00,000 | |
| | 66 | | 111 (14) | Origin | 1 | 1,00,000 | |
| | 67 | | 112 (15) | Joint Committee on Powder Diffraction Standards (JCPDF) | 1 | 1,00,000 | |
| | 68 | | 112 (16) | Chem draw | 1 | 1,00,000 | |
| | 69 | | 121 (78) | Geographical Information System (GIS) Software and Hardware: | 1 | 40,00,000 | |

सबब, पीएम-उषा योजनेच्या इक्युपमेंट घटकांतर्गत ६९ उपकरणे (६२ उपकरणे GeM / ई-निविदा आणि ७ उपकरणे एकलस्त्रोत (Single Source)) पुरवठादाराकडून खरेदी करण्याबाबत व सदर उपकरणे GeM पोर्टलवर उपलब्ध नसल्यास शासनाच्या CVC मार्गदर्शक सूचनानुसार व वित्त व लेखा विभागाच्या नियमानुसार प्रक्रिया राबविणेची बाब विचारार्थ.)

**ठराव:** पीएम-उषा योजनेच्या इक्युपमेंट घटकांतर्गत ६९ उपकरणे (६२ उपकरणे GeM/ई-निविदा आणि ७ उपकरणे एकलस्त्रोत (Single Source)) पुरवठादाराकडून खरेदी करण्याबाबत व सदर उपकरणे GeM पोर्टलवर उपलब्ध नसल्यास, शासनाच्या CVC मार्गदर्शक सूचनानुसार व वित्त व लेखा विभागाच्या नियमानुसार प्रक्रिया राबविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[९(२)]</td><td>कंत्राटी विशेष कार्यासन अधिकारी व नोडल अधिकारी यांचा कालावधी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये संपुष्टात येत आहे. तरी उक्त अधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामध्ये विविध पायाभूत सुविधा निर्मिती व विकासाच्या दृष्टीकोनातून विविध प्रकल्पाची सुरुवात झाली आहे. विद्यापीठाचे नविन प्रशासकीय इमारतीचे व खेलो इंडिया प्रकल्पाचे बांधकाम पुर्णत्वास येत आहे. तसेच विद्यापीठामध्ये पायाभूत सुविधा व शिक्षण आणि संशोधन विकासाकरिता पी.एम. उषा अंतर्गत निधी प्राप्त झाला आहे. विविध अध्यासन केंद्र, दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता शिक्षण सुविधा केंद्र, तृतीय पंथीय विद्यार्थ्यांकरिता शिक्षण सुविधा केंद्र अशा विविध प्रस्तावांचा पाठपुरावा करुन शासनाकडून भरघोस निधी प्राप्त करुन घेण्यासाठी व त्या कामाकरिता सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. या विविध प्रस्तावाचा पाठपुरावा करुन शासनाकडून मान्यता व निधी मिळण्याकरिता तो विशेष कार्यासन अधिकारी हा महाराष्ट्र व केंद्र शासनाची संपर्कात राहून विविध शासकीय कार्यालय व आस्थापने शी संपर्क करुन विद्यापीठात हे प्रकल्प कसे येतील आणि त्याकरिता शासन भरघोस निधी कसा देईल यासाठी प्रयत्न करेल. एक प्रशासन कुशल, इंग्रजी मराठी हिंदी या भाषेवर प्रभुत्व असणारा, महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासन यांच्याशी संपर्क करुन योग्य समन्वय साधणारा व विद्यापीठ विकासासाठी सदर प्रकल्पाची गरज आहे हे पठवून देणाऱ्या विशेष कार्यासन अधिकाऱ्याची गरज होती. तसेच प्रस्तुत विद्यीपीठाच्या अधिपत्याखालील जमिनीचा तपशील,७/१२ फेरफार, गट स्कीम उतारा, गाव नकाशा, जमिनीची मोजणी, जमिनीची सीमा व होणारे अतिक्रमण या सर्व कामाकरिता एका नोडल अधिकाऱ्याची गरज होती.<br>त्याअनुषंगाने दि. २४/०६/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदे समोर विषय सादर केला असता, व्यवस्थापन परिषेदेने पुढीलप्रमाणे ठराव पारीत केला आहे. ठराव क्र.०४ व ठराव क्र.१९ नुसार दोन्ही अधिकारी यांना ०६ महिन्याच्या कालावधीकरिता नेमणुक करणे बाबत ठराव पारित केला आहे.
<table>
<tr><td>ठराव क्र. ०४</td><td>कंत्राटी विशेष कार्यासन अधिकारी रुजू होणार नसल्याची नोंद घेण्यात आली. तसेच श्री. चंद्रकांत मारुती होळकर, सेवानिवृत्त सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांना कंत्राटी विशेष कार्यासन अधिकारी म्हणून ०६ महिन्याकरिता विद्यापीठ फंडातुन नियुक्त करण्यास व त्यांना प्रतिमाह रु. ३०,०००/- इतके मानधन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. १९</td><td>प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिपत्याखालील जमिनीचा तपशिल, ७/१२ फेरफार, गट स्कीम उतारा, गाव नकाशा, जमिनीची मोजणी, जमिनीची सीमा व होणारे अतिक्रमण या सर्व कामाकरिता श्री. शिवलिंगप्पा बसवणप्पा मल्लाबादे, सेवानिवृत्त मुख्यालय सहाय्यक यांना नोडल अधिकारी म्हणून ०६ महिन्याकरिता विद्यापीठ फंडातुन नियुक्त करण्यास व त्यांना प्रतिमाह रु.३०,०००/- इतके मानधन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
</table>
सदर कालावधी हा ३१ डिसेंबर, २०२५ रोजी संपुष्टात येत आहे.<br>सबब, कंत्राटी विशेष कार्यासन अधिकारी व नोडल अधिकारी यांचा कालावधी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये संपुष्टात येत आहे. तरी उक्त अधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>श्री. चंद्रकांत मारुती होळकर, कंत्राटी विशेष कार्यासन अधिकारी व श्री. शिवलिंगप्पा बसवणप्पा मल्लाबादे, नोडल अधिकारी यांना ६ महिने मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(३)] | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये पीएम-उषा योजनेअंतर्गत होणाऱ्या ०५ इमारतीच्या बांधकामास उपवनसंरक्षक (वन्यजीव) पुणे या कार्यालयाकडून जा.क्र.कक्ष-३/सर्व्हे-जमिन/संकिर्ण/ १०२५/ सन २०२५-२६ दि.०४/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये Wildlife Mitigation Measures नुसार गट क्रमांक ३५७ व गट क्रमांक ३६५ मध्ये करण्यास दिलेल्या मंजूरीनुसार करण्याची प्रशासकीय मान्यतेची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीवर गट क्र. ३५७ व ३६५ वरील एकूण ०५ इमारतीच्या बांधकामास ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत जा.क्र.पुअहोसोविसो /२०२५/८२५६ दि.०३/११/२०२५ रोजी मा. जिल्हाधीकारी, सोलापूर तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय सनियंत्रण पर्यावरण संवेदनशील क्षेत्र समिती, सोलापूर व मा. उपवनसंरक्षक अधिकारी तथा सचिव जिल्हास्तरीय सनियंत्रण पर्यावरण संवेदनशील क्षेत्र समिती, सोलापूर यांना पत्राद्वारे कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन उपवनसंरक्षक, सोलापूर वन विभाग, सोलापूर यांचे जा.क्र.ब/कक्ष-१३/मोजणी/२७२७/२०२५-२६ दि.१८/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये पर्यावरण संवेदनशिल क्षेत्राचे जिल्हासंनियंत्रण समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून मा कोंडी ता. उत्तर सोलापूर येथील पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र ग.नं. ३५७ व ३६५ मध्ये व्यवसायिक (Commercial) होणार नाही. या अटीनुसार तसेच सदरचे कामामध्ये वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम,१९८६ महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाने नियमा व कायदे तसेच इतर तदअनुषंगिक सर्व नियम, मे. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश यामधील तरतुदीचा भंग होणार नाही याची दक्षता आपले स्तरावर घेण्यात यावी. तसेच सदर प्रकरणी उपवनसंरक्षक (वन्यजीव), पुणे यांचेकडून wildlife Mitigation Measures तयार करून घेण्याच्या व पर्यावरण संवेदनशिल क्षेत्राची अधिसुचना दि.११/०२/२०२० मध्ये मुद्दा क्र. कलम ४ मधील नमुद केल्याप्रमाणे List of activities prohibited or to be regulated within Eco sensitive zone मधील Regulated activities मधील अ.क्र.१७ मध्ये Infrastructure including civic amenities नुसार सदरचे प्रकल्पास वन्यजीव विभागाकडून पुढील नियमानुसार उचित कार्यवाही करणेच्या अटीस अधिन राहून प्रकल्प यंत्रणेस पुढील काम करणेस सहमती दिलेली आहे.<br><br>उपवनसंक्षक वन विभाग, सोलापूर यांच्या इतिवृत्तांत प्रमाणे व्यवसायिक (Commercial) होणार नाही. व मा. वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे, यांचेकडून Wildlife Mitigation Measures तयार करून देण्याबाबत जा.क्र. पुअहोसोविसो/पी.एम-उषा/२०२५/१४४ दि.२१/११/२०२५ व गट क्रमांक ३५७ व गट क्रमांक ३६५ मधील प्रस्तावित बांधकामास परवानगी मिळण्याबाबत जा.क्र. पुअहोसोविसो/पी.एम-उषा/२०२५/१४५ दि.२१/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले असता, उपवनसंरक्षक (वन्यजीव), पुणे यांच्याकडून Wildlife Mitigation Measures हे खालील बाबींचे अधिन राहून मान्यता दिलेली आहे.<br>१. उन्हाळयाच्या कालावधीत अभयारण्य क्षेत्रात लागणाऱ्या वन वनवणवा पासुन बचाव करण्यासाठी तीन फायर ब्लोअरचा पुरवठा करण्यात यावा.<br>२. उन्हाळयाच्या काळात पाण्याचे स्त्रोत आटत व कमी होत असल्याने पाणवठयात वन प्राण्यांना पिणसाठी पुरेसे पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे.<br>३. वन्यप्राणी पक्षा संवर्धनासाठी व जनजागृतीसाठी योग्य त्या ठिकाणी Sign Boards लावण्यात यावे.<br>४. वाहतूक व दळण-वळण कामे रस्ते निर्मिती सुचना करण्यात येणार असल्याने योग्य त्या ठिकाणी गतिरोधक व रंबल स्ट्रिप्स करण्यात यावे. तसेच गती मर्यादा सुचना फलक योग्य त्या ठिकाणी लावण्यात यावे. | अभियांत्रिकी विभाग |

५. विद्युत वाहिन्याच्या तारा जर जमिनीवरून जात असतील तर त्यासाठी बर्ड डायवर्टर बसविणेची तजवीज ठेवून त्याची देखभाल योग्य त्यावेळी करण्यात यावी किंवा विद्युतवाहीनी जमिनी खालुन घेणे योग्य ठरू शकेल.

६. विद्यापीठ बांधकामे केल्यानंतर सदर इमारतींना भडक किंवा गडद रंग देण्यात येवु नये, त्या ऐवजी निसर्ग रंग संगती असणारे रंग देण्यात यावे, जेणे करून वन्यप्राण्यांना त्रास होणार नाही.

७. परिसरामध्ये सुशोभिकरण करणेसाठी वृक्ष लागवड करण्यात येणार असेल तर परदेशी वृक्षांना प्राध्यान्य न देता स्थानिक प्रजातींना प्राधान्य देण्यात यावे.

८. संरक्षण कामी कुंपण करण्यात येणार असेल तर त्यासाठा कोटेरी तारा ऐवजी काटे नसलेले जाळीचे कुंपन करण्यात यावे.

९. खालील बाबींकरीता आवश्यक निधी वनविभागाकडे वर्ग करण्यात यावा.

| अ.क्र | कामाचा तपशील | रक्कम (लाखात) |
|---|---|---|
| ०१. | तीन फायर ब्लोअरचा पुरवठा करणे. | १.८० |
| ०२. | पाणवठयात वनप्राण्याना पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करणे. | १.२० |
| ०३. | वन्यप्राणी पक्षी संवर्धनासाठी व जनजागृतीसाठी योग्य त्या ठिकाणी Sign Boards लावणे. | ७.०० |
| | एकुण एकंदर | १०.०० |

विद्यापीठासाठी संपादीक करण्यात आलेल्या जमिनीतील मौजे कोंडी गट क्र. ३५७ व ३६५ मध्ये प्रस्तावित बांधकामास परवानगी मिळाली आहे.

प्रस्तुत विद्यापीठामध्ये पीएम-उषा योजनेअंतर्गत होणाऱ्या ०५ इमारतीच्या बांधकामास मा. उपवनसंरक्षक (वन्यजीव) पुणे या कार्यालयाकडून जा.क्र.कक्ष-३/सर्व्हे-जमिन/संकिर्ण/१०२५/ सन २०२५-२६ दि.०४/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये Wildlife Mitigation Measures नुसार गट क्रमांक ३५७ व गट क्रमांक ३६५ मध्ये करण्यास दिलेल्या मंजूरीनुसार करण्याची प्रशासकीय मान्यतेची बाब विचारार्थ.

**ठराव:** **प्रस्तुत विद्यापीठामध्ये पीएम-उषा योजनेअंतर्गत होणाऱ्या ०५ इमारतीच्या बांधकामास उपवनसंरक्षक (वन्यजीव) पुणे या कार्यालयाकडून जा.क्र.कक्ष-३/सर्व्हे-जमिन/संकिर्ण/ १०२५/ सन २०२५-२६ दि.०४/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये Wildlife Mitigation Measures नुसार गट क्रमांक ३५७ व गट क्रमांक ३६५ मध्ये करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

Mahale

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचे सादर केलेले विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(४)] | मा. जयकुमार गोरे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, सोलापूर यांचेकडे जिल्हा नियोजन आणि विकास समिती (DPDC) किंवा त्यांच्या निधीमधून Digital Class Room साठी रु.५ कोटी निधी मागणीचा प्रस्ताव पाठविण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | मा. जयकुमार गोरे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, सोलापूर यांचेकडे जिल्हा नियोजन आणि विकास समिती (DPDC) किंवा त्यांच्या निधीमधून Digital Class Room साठी रु.५ कोटी निधी मागणीचा प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(५)] | मा. विजयकुमार देशमुख, विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य यांचेकडे नवीन मुख्य प्रशासकीय इमारत ते खेलो इंडिया इमारतमधील रस्त्याचे काम करण्यासाठी रु.३ कोटी निधी मागणीचा प्रस्ताव पाठविण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | मा. विजयकुमार देशमुख, विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य यांचेकडे नवीन मुख्य प्रशासकीय इमारत ते खेलो इंडिया इमारतमधील रस्त्याचे काम करण्यासाठी रु.३ कोटी निधी मागणीचा प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(६)] | मा. सुभाष देशमुख, विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य यांचेकडे ४८२ एकर परिसरातील विहीरीवरुन शेततळ्यापर्यंतची पाईपलाईन आणि शेततळेसाठी रु.५० लाख निधी मागणीचा प्रस्ताव पाठविण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | मा. सुभाष देशमुख, विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य यांचेकडे ४८२ एकर परिसरातील विहीरीवरुन शेततळ्यापर्यंतची पाईपलाईन आणि शेततळेसाठी रु.५० लाख निधी मागणीचा प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(७)] | Forest Wildlife साठी रु.१० लाख भरण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | Forest Wildlife साठी रु.१० लाख भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(८)] | प्रांत कार्यालयाकडे चलनाची रक्कम भरण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | प्रांत कार्यालयाकडून येणारी चलनाची रक्कम भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [९(९)] | गट क्र. ३६५ मध्ये Track तयार करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | गट क्र. ३६५ मध्ये Track तयार करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद